**तुकाराम पावडे विरुध्द छाया मगर**

## नि.क्र. ११ वर आदेश पारीत.

वादी यांनी मौजे हादगांव खुर्द ता. सेलु जि. परभणी येथील शेत गट क्र. ३७० मधील ३ हे ३५ आर पैकी वादीच्या मालकी व ताब्यातील ० हे ३७ आर या क्षेत्रफळाची न्यायालयीन आयुक्त म्हणुन तालुका भुमी अभिलेख यांची नियुक्त करुन ७/१२ प्रमाणे क्षेत्रफळाची मोजणी करुन हद्द खुणा कायम करण्याचे आदेशीत करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की, वादमिळकत ही वादीची वडीलोपार्जीत एकत्रीत कुटुंबातील मिळत असुन ७/१२ प्रमाणे वादीच्या मालकी व ताब्यात असलेले ० हे ३७ आर क्षेत्रफळ कमी भरत असुन त्यावर प्रतिवादीने अतिक्रमन केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आले. त्यामुळे वादीने प्रतिवादी यांना सदरची जमिन ही भुमी अभिलेख कार्यालय, सेलु यांच्या मार्फत मोजुन घेऊन व ७/१२ प्रमाणे हद्द खुणा कायम करुन घेऊन असे सांगीतले परंतु प्रतिवादीने वादीचे काही न ऐकल्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीचे पुढे असेही म्हणणे आहे की, मोजणीची फिस भरण्यात तो तयार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्याची वादीने विनंती केली आहे.

०३. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन कथन केले की, वादीचा दावा हा मनाई हुकुमबाबत आहे. तसेच प्रस्तुतच्या अर्जाव्दारे वादी स्वत:चे हक्कात नवीन पुरावा तयार करण्याचे प्रयत्नात आहे व तशी तरतुद कायद्यात नाही त्यामुळे वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज नियमबाह्य असल्याने फेटाळणे न्याय व जरुरीचे आहे. सबब प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादी विरुध्द शाश्वत मनाई हुकुम वादीच्या हक्कात मिळण्याकरीता तसेच वादमिळकतीची न्यायालयामार्फत मोजणी करुन वादीचे क्षेत्राचे ७/१२ प्रमाणे हद्द बंद खुणा कायम करुन देण्याबाबत दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप तसेच वादीने केलेली मागणी व त्याच्या मालकी हक्काच्या शेत जमिनीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे काय तसेच त्यांनी अतिक्रमण केले असल्यास ते किती क्षेत्रफळावर आहे हे तोंडी पुराव्यांव्दारे होऊ शकत नाही. त्याकरीता गट क्र. ३७० च्या संपुर्ण जमिनीची तसेच सह सामाईक सहभागदारकांची शेत जमिन मोजणी झाल्या शिवाय वादीच्या जमिनीवर नेमणे कोणाचे अतिक्रमण निघते हे स्पष्ट होणार नाही. त्यामुळे

प्रतिवादीच्या शेताची सुध्दा मोजणी झाल्या शिवाय वस्तुस्थिती समोर येणार नाही. अशा परिस्थीतीत, संपुर्ण गट क्र. ३७० ची मोजणी होणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**०१**. अर्ज नि.क्र.११ मंजूर करण्यात येतो.

**०२**. मौजे हादगांव खुर्द ता. सेलु जि. परभणी येथील गट क्र. ३७० मधील जमिनीची सह सामाईक सहभागदारांकांची शेत जमिनीची, मोजणी व हद्द खुणा कायम करण्याकरिता उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

**०३**. उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी गट क्र. ३७० ची मोजणी करुन वादीची उपरोक्त नमूद शेत जमीनीची हद्द खुणा कायम कराव्यात तसेच वादीच्या जमीनीसंदर्भात जायमोक्यावर असलेल्या स्थितीचा पंचनामा, नकाशा तयार करुन तत्संबंधीचा सविस्तर अहवाल प्रस्तुत प्रकरणी लवकरात लवकर दाखल करावा.

**०४**. वादीने आवश्यक न्यायालयीन शुल्क एक महिन्याच्या आत भरणा करावे.

**०५**. वादीने मोजणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व दाव्याची प्रत न्यायालयीन आयुक्त यांना पुरवावी.

**०६**. येणे प्रमाणे न्यायलयीन आयुक्त यांना प्रस्तुत आदेशाचे पत्र जारी करण्यात यावे.

MANDAR MOHAN RAUT
Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2025.04.03 17:43:40 +0530

दिनांक – ०३.०४.२०२५

**(मंदार मो.राऊत)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सेलू जि.परभणी